# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६ ००४

---

क्र. कोविम/उ.मा.व माध्य./गोप.प्रात्य/2371
कोल्हापूर -४१६००४
दिनांक - २२/११/२०२२.
२४

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १०वी) फेब्रुवारी - मार्च २०२३ परीक्षेबाबत.**

**संदर्भ :** क्र.रा.मं. / परीक्षा.६ / ६२५१, दिनांक १५/११/२०२२ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेची संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

राज्यामध्ये कोविड -१९ चा प्रादुर्भाव कमी झाला असल्यामुळे फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा प्रचलित पद्धतीप्रमाणे घेण्यात येणार असून, याबाबत खालील सूचना आपल्या स्तरावरून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, पालक व सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

१. सदर परीक्षा १०० % अभ्यासक्रमावर आधारित घेण्यात येणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी सर्व परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार निर्धारित कालावधीतच पार पाडावयाच्या आहेत.
२. परीक्षार्थ्याने प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
३. प्रचलित पद्धतीनुसार शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना निर्धारित केलेल्या केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहेत.
४. सदर परीक्षांच्या वेळेमध्ये कोणतीही वाढीव वेळेची सवलत देण्यात येणार नसून वेळापत्रकांमध्ये नमूद केलेल्या वेळेनुसार परीक्षा घेण्यात येणार आहेत.
५. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१७/(११८/१७)/ एस.डी. -६, दि. १६ ऑक्टोबर, २०१८ नुसार पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना असणाऱ्या सर्व सोयी सवलती देण्यात येतील.

(पोवार डी. एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.